International Journal for Multidisciplinary Research (IJFMR)
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# मराठी जैन कथेतील स्त्री प्रतिमा

**डॉ. जगदीश सदाशिव आवटे**

निवृत्त सहयोगी प्राध्यापक, ५०१ - बी, विशालदीप रेसिडेन्सी, मेडीपॉइंट हॉस्पिटलजवळ, चंदननगर, पुणे - ४११०१४.

## प्रास्ताविक

मानव जातीतील समाजरचनेत स्त्री आणि पुरुषाला समान स्थान आहे. स्त्री आणि पुरुष या दोघांच्या अस्तित्वामुळेच समाज ही संकल्पना अस्तित्वात येते. त्यापैकी कोणत्याही एकास महत्त्व देणारा समाज हा समाजाच्या यथार्थ कल्याणाशी सुसंगत होऊ शकत नाही. विश्वरथाची ही दोन चाके असल्याने विश्वरचनेत स्त्रीचे स्थान पुरुषाप्रमाणेच सहज स्वाभाविक, अनिवार्य व अभिन्न राहिले आहे. स्त्री ही पुरुषाला पूरक कार्य करणारी, सहयोगी, सहकार्य करणारी असल्याने गतैतिहासिक काळात विश्वेतिहासाला गतिमान करण्यात पुरुषाप्रमाणेच महत्त्वाचे कार्य स्त्रीनेही केलेले आहे. ऐतिहासिक काळात विश्वाला, युगाला, मानवजातीला नवीन प्रेरणा देऊन गतिमान बनविण्याचे कार्य जैन स्त्रीने केल्याची साक्ष इतिहासाची असंख्य पाने देत आहेत. म्हणूनच आज २१ व्या शतकात मानवी जीवनाच्या समाजरचनेत, सामाजिक गतिमानतेच्या सामाजिक प्रबोधन व संक्रमणाच्या प्रक्रियेत जैन महिलेला आदराचे, मानाचे व क्वचित का होईना पुरुषाच्या बरोबरीचे स्थान मिळालेले आहे.

## प्राचीन काळातील जैन स्त्री

प्राचीन काळाचा आढावा घेतला तर जैन स्त्रिया विदुषी, धर्मपरायण व कर्तव्यपरायण असल्याची माहिती मिळते. त्या निर्भय, वीरांगना व पतिव्रता असल्याची अनेक उदाहरणे आढळतात. पतीची सेवा करीत असतानाच कित्येक स्त्रियांनी राज्याच्या संरक्षणाचे कार्य केले आहे. युद्धकाळात प्रत्यक्ष भाग घेऊन शत्रूचा पराभव करण्याचे कार्यही त्यांनी केले. पतीच्या मृत्युनंतरही त्यांनी राज्यकारभार व्यवस्थित प्रकारे केल्याची अनेक उदाहरणे पाहावयास मिळतात. या कर्तव्यनिष्ठेबरोबरच धर्मनिष्ठ म्हणून जैन स्त्री प्रसिद्ध आहे. जैन स्त्रियांनी जैन धर्माच्या आचारविचारातून नुसताच आत्मोद्धार केला नाही तर आपल्या पतीलाही जैन धर्माचे उपासक बनविले. आपल्या मुलांना सुसंस्कारित व आदर्श बनविण्याचा प्रयत्न केला.

प्राचीन कालखंडातील जैन स्त्रियांचा हा वसा, वारसा अर्वाचीन कालखंडातही सुरु आहे. याचे दर्शन आपणास अनेक मराठी जैन कथांमधून पाहावयास मिळते. मराठी जैन कथासंग्रहात ढोबळ मानाने स्त्रियांचे पुढील वर्ग पाहावयास मिळतात. १. गृहिणी, २. प्राध्यापिका/नोकरदार, ३. साध्वी, ४. समाजसेविका, ५. तरुणी, ६. गरीब / शोषित. या सहा प्रकारातील स्त्री व्यक्तिरेखांचा विचार आपणास करता येतो.

## मराठी जैन साहित्यातील स्त्री दर्शन

मराठी जैन कथाप्रवाहात गृहिणी म्हणून अनेक स्त्री रुपे आपणास पाहावयास मिळतात. पारंपरिक कथावाङ्मयात आपणास एका विशिष्ट चौकटीत कथेची नायिका सापडते. धनुष्याकृती भुवयांची, चाफेकळी नाकाची, गुलाबी गालांची, डाळिंबी ओठांची, मोत्यासारख्या दातांची, लांब सडक केसांची, गजरा माळलेली, पैठणी साडीला जरीची किनार असणारी; अशा कथा नायिका आपणास पाहावयास मिळतात. जैन कथावाङ्मयात मात्र समाजजीवनाचे वास्तव चित्रण करणाऱ्या कथा नायिका आपल्यासमोर येतात. 'पुनीत` कथासंग्रहातील सौ. सुरेखा शहा यांच्या 'संघर्ष` कथेतील स्नेहलता, 'परहिदं च कादव्वं या कथासंग्रहातील सौ. नीलम माणगावे यांच्या 'नवं मंदिर` या कथेतील मालू, 'शासन` कथासंग्रहातील सौ. मीना गरीबे यांच्या 'माता` कथेतील कुंदाताई ; ही सर्व स्त्रीरुपे उत्तम गृहिणी म्हणून आपणासमोर येतात.

जैन समाजातील उत्तम गृहिणीचा आदर्श म्हणून आलेली 'परहिदं च कादव्वं` या कथासंग्रहातील सौ. नीलम माणगावे यांची 'नवं मंदिर` ही कथा आपण पाहूया. मालू ही या कथेची कथानायिका आहे. ती कर्तव्यदक्ष सून आहे. सासऱ्याच्या मृत्यूनंतर सासू खचते आणि अंथरुण धरते. ह्या काळात पोटच्या मुलीप्रमाणे ती सासूची शुश्रूषा करते. पण सहा महिन्यांतच सासूचे निधन होते. घरात बाहेरगावी असणाऱ्या दीर, जाऊ, नणंदा हे सर्वजण जमतात आणि सुतक संपण्याच्या अगोदरच वाटणीवरुन वाद घालतात. मालू ह्यामुळे उद्विग्न होते. स्वतःकडे कर्जाचा वाटा घेऊन इतरांना

त्यांच्या अपेक्षेप्रमाणे वाटा देण्यास तयार होते. सासूच्या आठवणीसाठी एक वर्षभर एखादा पदार्थ वर्ज्य करण्याचा निर्णय घेण्यासाठी सर्व कुटुंबीय मंदिरात जातात. प्रत्येकजण मंदिरातील पुजाऱ्यासमोर वर्ज्य करावयाच्या पदार्थाचे नाव सांगतात. मालू मात्र पदार्थ वर्ज्य करण्यास नकार देते. उलट सासूच्या सद्गुणांचा किमान वर्षभरासाठी आणि शक्य झाल्यास आयुष्यभरासाठी स्वीकार करण्याचा निर्णय सर्वांसमक्ष घेते. अशी जगावेगळी कर्तव्यदक्ष सून आपणाला या कथेतून पाहावयास मिळते. कर्जाचा डोंगर दुसऱ्याला न देता स्वतः स्वीकारणारी जैनधर्मीय आदर्श गृहिणी आपणास या कथेत भेटते.

आधुनिक काळात माणसांची मने संकुचित झाली आहेत. स्वार्थी झाली आहेत. पण या स्वार्थी जगात दुसऱ्यांसाठी काहीतरी करणारी ही जैन गृहिणी लक्षात राहते. या जैन गृहिणीने काय काय केले ? हे पुढील वर्णनावरुन आपल्यासमोर येते. "सून म्हणून मी सासू सासऱ्यांची थोडी का सेवा केली ? मुलीपेक्षा मी कुठं कमी पडले ? शेवटच्या दिवसात मुली फक्त शोभेच्या बाहुल्या म्हणून आल्या. त्यांनी काय केलं ? दोघांच्या खस्ता मी काढल्या. निधन होईपर्यंत सेवा-शुश्रूषा मी केली. अगदी मलमूत्र उचलून टाकण्यापर्यंत आणि घाण काढण्यापर्यंत, कपडे धुण्यापर्यंत सगळं मी केलं. शेवटी णमोकार मंत्राचा जपही मीच सांगितला. त्यांना शक्यतो समाधीमरण मिळवून देण्यासाठी रात्रंदिवस मी जागले. तासातासाला सल्लेखना देऊन त्यांना जागृत ठेवण्याचं काम मी केलं. शांतिसागरांचा अंतिम उपदेश ऐकवीत, ऐकवीत मी त्यांना सद्गती मिळवून दिली."[१]

या कथेतील नायिकेविषयी समीक्षक डॉ. दादा गोरे म्हणतात, "सासूचा चांगुलपणा, माणुसकी, संयम, शांत वृत्ती, दुसऱ्यासाठी सतत झिजणे या सद्गुणांचा वर्षभरासाठी का होईना अंगीकार करणारी सून आपल्या लक्षात राहते."[२] अशा प्रकारे जैन गृहिणी ही सर्वांना सांभाळून घेणारी, इतरांचे अपराध स्वतःच्या पदरात घेणारी असल्याचे दिसून येते.

मराठी जैन कथासाहित्यात नोकरी करणाऱ्या (विशेषतः प्राध्यापिका) स्त्रिया आपणास भेटतात. 'शासन' कथासंग्रहातील प्रा. सौ. मधुमती पाटील यांची 'अँड दि टिटॅनिक वॉज सेव्हड' आणि सौ. मालती देशमाने यांची 'मन ओढाळ ओढाळ' या कथा यांची उत्तम उदाहरणे आहेत. प्रा. मधुमती पाटील यांनी आपल्या कथेतून 'प्राध्यापिका मेधा' आपल्यासमोर ठेवली आहे. उत्तरपत्रिका तपासण्याच्या विद्यापीठाच्या कामानिमित्त प्रा. मेधाची प्रा. रवीशी ओळख होते. रवी ही ओळख वाढवून मेघाला स्वतःच्या जाळ्यात ओढू लागतो. त्यामुळे मेधाची स्थिती दोलायमान होते. पती, मुलगा यांच्यासह मेधाचा संसार सुरळीत सुरु असतो. पण रवीमुळे संसाराचे तारु भरकटू लागते. रवीशी तिचा पत्रव्यवहार सुरु राहतो. एक दिवस ती पतीसह रवीच्या घरी खास भेटायला जाते. तिथे रवी चहा बनवायला कीचनमध्ये गेल्यावर केवळ योगायोगाने आलेल्या एका मुलीच्या फोनवरुन मेधाला रवीचे खरे दर्शन घडते. रवीने त्या मुलीला उद्ध्वस्त केलेले असते. मेधा सावध होते. घरी आल्यानंतर तिला स्वप्न पडते. 'तिचे तारु सागरातील हिमनगापासून केवळ णमोकार मंत्रामुळे बचावते' अशा आशयाचे ते स्वप्न असते.

आपल्या सुखी संसाराला कोणत्याही आकर्षणाची दृष्ट न लागण्याची काळजी प्रा. मेधा घेते. म्हणूनच नोकरी करणाऱ्या जैन स्त्रियांमध्ये ती लक्षात राहते. या कथेविषयी प्रा. धनंजय शहा म्हणतात, "विवाहित असूनही आपल्या लंपट प्राध्यापक सहकाऱ्याच्या आकर्षक व आक्रमक व्यक्तिमत्त्वाला भुलून आपल्या सुखी संसाराची नौका वासनेच्या वादळात चक्काचूर होण्यापासून वाचवणारी मेधा विशेष लक्षात राहते."[३]

मराठी जैन कथांमधील नोकरी करणाऱ्या स्त्रीचे दुसरे उदाहरण म्हणजे मालती देशमाने यांची 'मन ओढाळ ओढाळ' ही कथा होय. विभावरी ही या कथेची नायिका आहे. जिनदास आण्णांनी मातृसुख न लाभलेल्या मुलाला, विभाकरला शिक्षण देऊन गावातील महाविद्यालयात प्राध्यापकाची नोकरी मिळवून दिली. विभाकरचे विभावरीशी लग्न झाले. लग्नानंतर थोड्याच दिवसात विभाकरचा हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यु होतो. आण्णांनी विभाकरच्या जागेवर विभावरीला नोकरी मिळवून दिली. विभा कॉलेजमध्ये अरुण नावाच्या प्राध्यापकाच्या मोहात पडू लागली. निवृत्त शिक्षक असलेल्या आण्णांना हे खटकू लागले. एक दिवस अरुणने संधी साधून विभासमोर विवाहाचा प्रस्ताव मांडला. परंतु विवाह करुन विभाच्या संपत्तीचा मालक होण्याचा अरुणचा स्वार्थी हेतू लक्षात येताच विभाने हा प्रस्ताव धुडकावला. आण्णांनी विभाला पुनर्विवाहाचा सल्ला दिला. हाही सल्ला धुडकावून विभाने एका अनाथ मुलीला दत्तक घेण्याचा विचार आण्णांजवळ व्यक्त केला. त्यावेळेस आण्णांना आपल्या सुनेचा अभिमान वाटला. अशा कथानकात आपणासमोर ही कथा येते. यात नोकरी करणारी विभावरी खास लक्षात राहते. कोणत्याही मोहाला ती बळी पडत नाही. शेवटी ती समाजकार्याकडे वळते. या कथानायिकेचे मोठेपण व्यक्त करताना समीक्षक प्रा. धनंजय शहा म्हणतात,"अकाली वैधव्य प्राप्त झाल्यावर प्राध्यापकी करुन आपल्या सोज्वळ सासऱ्यासह आपला आदर्श संसार सांभाळणारी पण स्वार्थी, लोभी अशा प्राध्यापक सहकाऱ्याच्या अल्पशा सहवासात वासनेच्या वावटळात वाहून न जाता विचारीपणाने स्वतःला सावरणारी विभा लक्षात राहते."[४]

वरील मोजकी उदाहरणे सोडता आपणास मराठी जैन कथासाहित्यात फार मोठ्या प्रमाणात नोकरी करणाऱ्या स्त्रियांची उदाहरणे सापडत नाहीत. सापडतात ती मोजकी उदाहरणे. पण ती सशक्त आहेत. वाचकांच्या मनाचा ठाव घेणारी आहेत.

मराठी जैन कथाप्रवाहात पुढील महत्त्वाचे स्त्री रुप पाहावयास मिळते ते म्हणजे 'साध्वी' स्त्रियांचे. संसार सांभाळणाऱ्या आणि संसार सोडून मोक्ष प्राप्तीसाठी साध्वी झालेल्या स्त्रिया अशा प्रकारची दोन रुपे आपणास जैन कथांत पाहावयास मिळतात. 'पुनीत' कथासंग्रहातील सौ. सुरेखा शहा यांच्या 'जोगन, छांड गयी संसार' या कथेतील जयमाला, 'गिरनार' कथासंग्रहातील प्रा. वृषाली मगदूम यांच्या 'अग्निपरीक्षा' या कथेतील सन्मती, 'शासन' कथासंग्रहातील नीलम माणगावे यांच्या 'शासन' कथेतील माताजी ही उदाहरणे म्हणजे जैन धर्मातील साध्वी असणाऱ्या महिलांची उत्तम उदाहरणे आहेत. चांगल्या व वाईट अशा दोनही साध्वींची रुपे आपणाला या कथाप्रवाहात पाहावयास मिळतात.

उदाहरणादाखल आपण सौ. सुरेखा शहा यांच्या 'जोगन, छांड गयी संसार' या कथेतील जयमाला ही व्यक्तिरेखा पाहूया. जयमाला शहा हिला आपल्या सनतकुमार ह्या भावाच्या आकस्मित मृत्युमुळे जबर धक्का बसतो.ती मौन धारण करते. इंदोरची मावशी हवापालट म्हणून तिला इंदोरला नेते. मावशीचे पती महेश जयमालेचा विनयभंग करतात. हा तिला बसलेला दुसरा जबर धक्का. ज्ञानमतीजींच्या प्रवचनामुळे जयमाला दीक्षा घेते व श्रुतकीर्तीजी हे नाव धारण करते. ठिकठिकाणी प्रवचने देत ती फिरते. धर्मप्रसाराबरोबरच समाजप्रबोधनही करते. उदा. हुंडाबळी, शिक्षणासाठी दानाचे आवाहन. श्रुतकीर्तीजीच्या या संदेशामुळे प्रभावित होऊन डॉ. दिनेश गांधी आठवड्यातून दोन दिवस विनामूल्य रुग्ण सेवा करण्याचा निर्णय घेतात. ह्याच दिनेशचे स्थळ पूर्वी तिच्यासाठी विवाहाकरता आलेले होते. ही साध्वी समाजासाठी आयुष्यभर जगताना दिसते. तरुणपणीच तिने दीक्षा घेतली आहे. याच कथेत दुसरी साध्वी आपणास भेटते ती म्हणजे चंदनमती माताजी. ही मात्र संन्यास सोडून गायकाबरोबर लग्न करते.

दीक्षा घेतल्यानंतर पाच वर्षानंतर श्रुतकीर्ती स्वतःच्या गावात येते. प्रवचन देते. तिच्या आईचा जीव मातृप्रेमापोटी तळमळत असतो. पण साध्वी म्हणून असणारी भूमिका जयमाला सोडत नाही. तिच्या साध्वी म्हणून कार्याचे पुढील वर्णन पहा, "धर्म प्रसाराबरोबरच माताजींचं समाज प्रबोधनही सुरु. समाजातील अनिष्ट रुढी, हुंडा, अज्ञान, दुराचरण नाहीसं व्हावं हा हेतू. कारण का, तर आधी या अशा स्थूलपणे वाईट असणाऱ्या गोष्टी कमी झाल्या तरच धर्मप्रसाराचा उपयोग. नाहीतर पालथ्या घड्यावर पाणीच ! अर्थात धर्मप्रसार हा हेतू दीक्षेमागे नव्हताच. ते सहज घडणार ! दान, दया, शील, सेवा, ज्ञान यांचा प्रसार त्यांच्या प्रवचनात.... कित्येक तरुणांची हुंडा न घेण्याची प्रतिज्ञा, तर शिक्षण प्रसारासाठी कित्येकांच्या दानाचा वर्षाव..."[१] जैन साध्वी समाजासाठी किती उत्तम चांगले काम करतात याचे यथार्थ दर्शन आपणास या कथेतून पाहावयास मिळते.

जैन धर्मातील गृहिणी धर्माबद्दल असणाऱ्या गाढ श्रद्धाभावनेमुळेच साध्वी होतात. संन्यास घेतात. याचे उत्तम उदाहरण आपणास 'गिरनार' कथासंग्रहातील प्रा. वृषाली मगदूम यांच्या 'अग्निपरीक्षा' या कथेत पाहावयास मिळते. सन्मती ही या कथेची नायिका आहे. गरीब घराण्यातील सन्मतीचे श्रीमंत घरातील आदिनाथशी लग्न होते. सासरे धार्मिक वृत्तीचे शांत व स्वभावाचे असतात. सासूचा स्वभाव मात्र त्यांच्या उलट असतो. सासूने मुलाला वडिलांच्या विचारसणीपासून दूर ठेवलेले होते. त्यामुळे सन्मतीची कुचंबणा होते. सम्मेद नोकरीसाठी दूर गेल्यावर सन्मती दीक्षा घेते. तिचा हा निर्णय तिच्या मुलांना, कुटुंबियांना धक्कादायक असतो. दीक्षा घेतल्यानंतर एकदा सन्मतीवर स्वतःच्याच गावात चातुर्मासानिमित्त प्रवचन देण्याचा योग आला. एवढेच नव्हे स्वतःच्याच घरात तटस्थपणे आहार घ्यावा लागला. तिच्या प्रवचनाच्या प्रभावामुळे तिच्या पतीनेही दीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. धर्माबद्दल गाढ श्रद्धाभावना असणारी एक स्त्री लग्नानंतर चाळीसाव्या वर्षी विरक्त भावनेने साध्वीची दीक्षा घेते. तिच्या प्रवचनाच्या प्रभावामुळे ऐषआरामी पतीसुद्धा दीक्षा घेण्याचा निर्णय घेतो. धर्मप्रसारास सिद्ध होतो. सुखी संसारातून धर्म जीवनाकडे वळालेली ही यशस्वी साध्वी आपणाला या कथेत पाहावयास मिळते.

मराठी जैन कथांमधील साध्वी या विभागातील स्त्री व्यक्तिरेखांचा आपण विचार करतो त्यावेळेस आपणाला एका बाजूला संसार सोडून वैराग्याचे रुप घेणाऱ्या काही साध्वी भेटतात. तर दुसऱ्या बाजूला या जगातील मोह मायामुळे वैराग्याचे रुप सोडून पुन्हा संसारात आलेल्या साध्वीही भेटतात. 'पुनीत' कथासंग्रहातील सौ. सुरेखा शहा यांची 'जोगन, छांड गयी संसार' या कथेतील चंदनमती माताजी संन्यास सोडून गायकाबरोबर लग्न करताना पाहावयास मिळते. त्यावेळेस 'जौगन, छांड गयी संसार' या कथा शीर्षकास बळकटी आलेली दिसते.

साध्वी म्हणून असणारे आचार आणि विचार सोडणारी दुसरी साध्वी आपणास 'शासन' कथासंग्रहातील 'शासन' या कथेत भेटते. साध्वी म्हणून जगणाऱ्या स्त्रियांनी कोणताही मोह धरु नये. कोणत्याही सुखसोयींचा उपभोग घेऊ नये, हा आचारधर्म आहे. पण या कथेतील साध्वींचा तोल ढळतो. त्यांच्याकडून विविध गोष्टींचा उपभोग घेतला जातो. 'शासन' कथेतील पुढील वर्णन पहा - "सचिन म्हणाला, 'त्या माताजी तर फोनवर पंधरा-पंधरा, वीस-वीस मिनिटं कुणाशी बोलत राहतात. कुणास ठाऊक आणि बोलणं तरी कसं.... कॉलेजच्या पोरीसारखं... हसणं काय, खिदळणं

काय, मी तर चाटच पडलो. 'बस्तीत तर फोन नाही. मग कुठून बोलतात त्या.' 'आमच्याच घरातून. मध्ये तर एकदा रडकुंडीला आल्यासारख्या 'मला काही माहीत नाही. माझा काय संबंध ? मी काही मध्यस्थी केली नाही.' वगैरे वगैरे बोलत होत्या. माताजींना विचारायचं कसं म्हणून गप्प राहिलो. पण वडील खूप चिडले होते. आईनं कसं बसं शांत केलं त्यांना."[६]

ज्यांच्यावर समाज विश्वास टाकतो, आदराने पाहतो, त्याच व्यक्ती जर चुकल्या तर कोणाकडे पाहायचे ? असा प्रश्न समाजात निर्माण होतो. धर्म समजावून सांगणाऱ्या अशा अनेक साध्वी स्वतः मात्र कधी कधी अधर्माने वागतात. त्याचेच दर्शन 'शासन' कथा आपणाला घडवते. मराठी जैन कथांमधून आपणाला अशा दोनही बाजूच्या साध्वी महिलांची व्यक्तिचित्रे पाहावयास मिळतात.

मराठी जैन कथांमधून गृहिणी, नोकरदार, प्राध्यापिका, साध्वी, माताजी अशा महिला पाहावयास मिळतात. त्याचप्रमाणे स्वतःचा संसार सांभाळता सांभाळता इतरांना मदत करणाऱ्या दयाळू, कनवाळू, समाजसेविका इतरांना हात देणाऱ्या महिलासुद्धा पाहावयास मिळतात. 'परहिदं च कादव्वं' या कथासंग्रहातील सौ. लीला शहा यांची 'तेवते निरांजन.... जळालेली नोट' आणि सुमेर जैन यांची 'त्या चौघीजणी' या दोन कथा, 'गिरनार' कथासंग्रहातील सौ. सुरेखा शहा यांची 'प्रश्न' आणि सौ. मीना गरीबे यांची 'शाल' या कथा, 'अभिषेक' या कथासंग्रहातील सौ. सुरेखा शहा यांची 'पेटलेले पाणी' ही कथा. यासारख्या कथांमधून मराठी जैन कथेतील समाजसेविका स्त्री आपणासमोर उभी राहते. भगवान महावीरांनी सांगितलेल्या तत्त्वाने जगणाऱ्या या स्त्रिया आपणाला सदर कथांमधून भेटतात.

'परहिदं च कादव्वं' या कथासंग्रहातील 'त्या चौघीजणी' ही कथा मराठी जैन कथा प्रवाहातील समाजसेविका महिलांची कथा म्हटले तर वावगे ठरु नये. जिनप्रिया, अनुपमा, समाधी, प्रियंवदा, अमृता ह्या त्या समाजसेविका मुली आहेत. या तरुणींनी नागालँडमधील नक्षलवादी परिसरात आश्रम सुरु केला आहे. त्यातून त्या समाजसेवा करत आहेत. त्या तरुणी सुशिक्षित, अतीश्रीमंत तसेच धार्मिक आहेत. एकदा योगायोगाने जिनप्रिया दगडफेकीत जखमी होते. नक्षलवाद्यांचा त्रास वाढतो. पोलिसांवरील ताण वाढल्याने ते आश्रमाला विरोध करतात. तेथील राजकारणी तसेच आदिवासी देखील आश्रमाला विरोध करतात. परंतु त्या चौघीजणींचा समाजसेवेचा निर्धार ठाम आहे. शेवटी जिनप्रिया ठरवते की, केवळ याच परिसरात कार्य करण्यापेक्षा संपूर्ण देशभरच आपण समाजसेवेची अनेक रोपटी लावूया. त्यानुसार त्या कामालाही लागतात. कथेचे कथानक येथे संपते. पण जैन धर्मातील असणाऱ्या समाजसेविकांची पात्रे मात्र कायमची लक्षात राहतात. म्हणूनच या कथेविषयी आणि समाजसेविका साध्वीविषयी डॉ. दादा गोरे म्हणतात, "मुंबईची प्रियंवदा, मद्रासची जिनप्रिया, आग्र्याची अनुपमा, आणि कलकत्त्याची मा समाधी या चार लावण्यवती जैन साध्वींची ही कथा. जैन तत्त्वांसाठी संघर्ष देणाऱ्या या साध्वी मराठी जैन साहित्यात वैशिष्ट्यपूर्ण ठराव्यात."[७]

वरील चार समाजसेविकांप्रमाणेच लीला शहा यांच्या 'तेवते निरांजन.... जळालेली नोट' या कथेतील इतरांना मदत करणारी माधवी, सुरेखा शहा यांच्या 'प्रश्न' या कथेतील प्रतिभा, सौ. मीना गरीबे यांच्या 'शाल' कथेतील गरीब महिलेच्या अंगावर किमती शाल घालणारी नंदा, सौ. सुरेखा शहा यांच्या 'पेटलेले पाणी' या कथेतील सुनीता ; या समाजसेविका म्हणून येणाऱ्या महिला लक्षवेधक ठरल्या आहेत. जैन कथा साहित्यातील समाजसेविका म्हणून नोंद घेण्यासारख्या आहेत.

मराठी जैन कथा वाङ्मयात आढळणाऱ्या पुढील स्त्री व्यक्तिरेखा म्हणजे तरुण स्त्री, युवती या होत. पुरोगामी आणि प्रतिगामी, नव्या आणि जुन्या अशा विविध मतप्रवाहातील युवती आपणास मराठी जैन कथाप्रवाहात पाहावयास मिळतात. सौ. सुरेखा शहा यांच्या 'अनुत्तरित' या कथेमधील आकांक्षा, 'मृत्युंजय' कथेमधील 'प्रिया', 'श्रावण' कथेमधील अमृता, राजेंद्र बीडकर यांच्या 'पेच' कथेतील शाल्मली, नीलम माणगावे यांच्या 'परिवर्तन' कथेतील पद्मा, प्राचार्य डी. डी. मगदूम यांच्या 'मुद्रांकित' कथेतील मनिषा, सौ. मेघा आलासे यांच्या 'क्षमास्मृती' कथेतील सुलुकाकी, उदिता शहा यांच्या 'मिसफिट' कथेतील पूजा, सौ. सन्मती शहा यांच्या 'वळण' कथेतील गुड्डू या काही लक्षात राहणाऱ्या मराठी जैन कथेतील युवती होत.

उदाहरणादाखल आपण सौ. सुरेखा शहा यांच्या 'परहिदं च कादव्वं' या कथासंग्रहातील 'श्रावण' कथा पाहू. अमृता ही या कथेची कथानायिका आहे. तिला गायनाची आवड आहे. लग्नाअगोदर ती गायनाचे कार्यक्रम करत होती. तिच्या गायनाबद्दल इतरांकडून कौतुक होत होते. तिला गायनाची आवड असणाऱ्या एका तरुणाचा लग्नाचा प्रस्ताव येतो. पण तो परराज्यातील आहे म्हणून अमृता नाकारते. शेवटी अमृताचे एके ठिकाणी लग्न जमते. स्थळ श्रीमंत असते. अट एकच. ती म्हणजे लग्नानंतर गायने नाही. तडजोड म्हणून ही अट मान्य केली जाते. परंतु लग्नानंतर अमृताचे गाणेच बंद झाल्याने नाराज होते. तिचा मानसिक कोंडमारा होतो. बाथरुममध्येसुद्धा गायचे नाही. गाण्याची कॅसेटही लावायची नाही, इतक्या जाचक अटी तिच्यावर घातल्या जातात. शेवटी हा ताण सहन न झाल्याने अमृता झोपेच्या गोळ्या घेऊन आत्महत्येचा प्रयत्न करते. कथा

इथे संपते. पण तरुणाईतील सुप्त गुणांना दाबले तर तरुणाई कोमेजून जाते, हा विषय या कथेतून समोर येतो. तसेच जैन समाजात गाणे या विषयाबाबत असणारी पुरुषी बंधनेही समोर येतात.

समाजाच्या बंधनांना बळी पडणारी 'श्रावण' कथेतील अमृता ही जैन तरुणी एका बाजूला तर समाजव्यवस्थेतील नागवेपणा परखडपणे मांडणारी सौ. उदिता शहा यांच्या 'मिसफिट' कथेतील पूजा ही तरुणी दुसऱ्या बाजूला हे चित्र आपल्यासमोर येते. पूजा मुंबईत वाढली आहे. जैन आचार-विचाराप्रमाणे जगणारी आहे. शिक्षणासाठी ती मुंबई सोडते. ग्रामीण शहरी या सीमारेषेवर असणाऱ्या गावी येते. जैन मंदिरात नियमित जाते. पण ती जीन्स पॅन्ट आणि टी शर्ट घालून जाते. तिच्या ह्या वेशात मंदिरात येण्यावर त्याच्या मंदिराचे ट्रस्टी आक्षेप घेतात. पण याच ट्रस्टींना ही पूजा तुमचे मंदिरातील सहकारी कशासाठी मंदिरात येतात हे सुनावते. प्रेमभराने जिनदासाला नमस्कार करते व निघून जाते. कथा येथे संपते. पण सत्य, अस्तेय, या तत्त्वाने जगणारी पूजा स्वतंत्र बाण्याची सदसद्विवेक बुद्धीची जैन तरुणी आपल्यासमोर येते, आपल्या लक्षात राहते.

मराठी जैन कथाप्रवाहात दिसणारे पुढील स्त्रीरुप म्हणजे गरीब शोषित स्त्रीचे. हाडाची काडे, रक्ताचे पाणी करुन या स्त्रिया आपला संसार सांभाळताना दिसतात. श्रेणिक अन्नदाते यांच्या 'कळस' कथेतील कोल्हाटीण, नीलम माणगावे यांच्या 'प्रसाद' कथेतील चंपा, डॉ. शरयु शहा यांच्या 'चित्रा' कथेतील चित्रा, सुशीला वालचाळे यांच्या 'स्त्रीधन' कथेतील सुवर्णा, शोभना शहा यांच्या 'भागी' कथेतील भागी, या काही गरीब स्त्रियांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तिरेखा आहेत.

उदाहरण म्हणून आपण 'अभिषेक' कथासंग्रहातील शोभना शहा यांची भागी नावाच्या कथेतील भागी ही व्यक्तिरेखा पाहूया. भागी नावाची कष्टाळू, गुणी मोलकरीण निवेदिकेच्या घरी घरकामाला येत असते. घरातील धार्मिक वातावरणामुळे ती मांसाहार बंद करते. एकदा भागी निवेदिकेच्या घरचे दळण आणत असताना एक चोर ते दळण हिसकावून चोरुन पळवण्याचा प्रयत्न करतो. पण त्याचा प्रयत्न फसतो. लोक त्या चोराला पकडतात. मार देतात. पोलीस कोठडीत नेऊन टाकतात. तक्रार नोंदवण्यासाठी निवेदिकेला व भागीला पोलीस ठाण्यात जावे लागते. घरातील मुलांची भूक भागविण्यासाठी त्या माणसाने चोरीचा प्रयत्न केल्याचे कळताच भागी तक्रार मागे घेते. चोराला पन्नास रुपये देते. त्या चोराला घरी जेवायला बोलवते. भागीचा मोठेपणा पाहून लेखिकेला स्वतःतील खुजेपणा जाणवतो. आपल्याकडून भागीएवढे मोलमजुरीचे काम होईल का ? असा प्रश्न तिला पडतो. भागी ही या कथेतील मोलकरीण असूनही तिच्या मनाच्या मोठेपणामुळे विशेष लक्षात राहते.

**समारोप**

अशाप्रकारे आपणास मराठी जैन कथावाङ्मयात गृहिणी, प्राध्यापिका, साध्वी, समाजसेविका, युवती, गरिबीत जीवन जगणाऱ्या अशा सहा प्रकारच्या व्यक्तिरेखा पाहावयास मिळतात. मराठी जैन कथावाङ्मयात जैन कथा लेखिकांचे प्रमाण जास्त असल्याने स्त्री पात्रे उठावदारपणे आपणासमोर येतात. मराठी जैन कथाप्रवाहात स्त्री व्यक्तिरेखांचा वाटा मोठा आहे.

**संदर्भ व टिपा**

१. माणगावे नीलम, परहिदं च कादव्वं, उनि, पृष्ठ ५.
२. गोरे दादा, गिरनार, उनि, पृष्ठ १६०.
३. शहा धनंजय, शासन, उनि, पृष्ठ ६.
४. तत्रैव, पृष्ठ ६.
५. शहा सुरेखा, पुनीत, उनि, पृष्ठ ९.
६. माणगावे नीलम, शासन, उनि, पृष्ठ १६६.